# बृहन्मुंबई महानगरपालिका

(घन कचरा व्यवस्थापन आर/मध्य विभाग)

क्र. सहा.अभि./आर-मध्य/१६४१/घकव्य दि.११.०६.२०२४

## जाहिरात

विषय :- आर/मध्य विभागात स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान (वस्ती स्वच्छता योजना) राबविण्याबाबत

आर/मध्य विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत, स्वच्छतेबाबत साफसफाईच्या कामाकरीता स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान (वस्ती स्वच्छता योजना) राबविण्याकरीता आर/मध्य विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत बचतगट तसेच दि. ३१.०५.२०२२ पूर्वी नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत मजुर सहकारी, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था इ. संस्थांमार्फत स्वयंसेवकांचा पुरवठा करण्याकरीता संस्थांची पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

| अनु. क्र. | योजनेचे नाव | कामाकरीता निवड करावयाच्या संस्था |
|---|---|---|
| 1 | स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान (वस्ती स्वच्छता योजना) | १६ |

अर्जाचा नमुना आर/मध्य विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु.१३२०/- अधिक १८% वस्तू व सेवा कर रोख स्वरुपात दि.१२.०६.२०२४ ते दि.२१.०६.२०२४, सकाळी १०.३० ते दुपारी ०१.३० यावेळेत विकत मिळु शकेल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/मध्य विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी. संस्थेने आर/मध्य विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. २१.०६.२०२४ (दुपारी ०३.०० वाजेपर्यंत)

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-

सहाय्यक अभियंता (घकव्य) आर/मध्य